महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(A Govt. of Maharashtra Undertaking)
CIN : U40109MH2005SGC153645

दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
फॅक्स नं. : ०२२-२६५८१०८३
Email : ciro@mahadiscom.in
Websitee : www.mahadiscom.in

औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
प्लॉट जी - ९, प्रकाशगड, ४ था मजला,
प्रा. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.

जा. क्र. : औसंवि/ब/ककनिस/६२वी बैठक/ - 5017 दिनांक : 3 MAR 2017

# परिपत्रक

विषय : म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ६२ व्या बैठकीत घेण्यात आलेले निर्णय.

********

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी कल्याण निधी समितीची ६२ वी बैठक दि. १७/०१/२०१७ रोजी हॉंगकॉंग बॅंक इमारत, फोर्ट, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

**अ)** म.रा.वि.मं कर्मचारी कल्याण निधीमधून कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना ठराविक आजाराकरीता आर्थिक मदत देण्यात येते. सदर योजनेसाठी कर्मचाऱ्याच्या कुटूंबाची व्याख्या ही महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एमएजी१०९९/प्र.क्र.२२०/आ.३, दि. १८/०८/१९९९ व त्यानुषंगाने झालेल्या वेतन पुर्ननिधारण करार दि.२६/०६/२०१४ तद्नंतर महावितरण कंपनीचा संघटनांशी झालेला करार दि. २३/१२/२०१४ व त्यानुषंगाने महावितरण कंपनीचे परिपत्रक क्र. औसंवि/ब/३८५७, दि. ०२/०२/२०१६ नुसार कुटूंबाची व्याख्या MSEB HCL Group Mediclaim Policy अंतर्गत लागू करण्यात आली. सबब, म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधीकरीता कुटूंबाची व्याख्या खालील प्रमाणे आहे.

१. कर्मचारी /अधिकारी यांची पत्नी किंवा पती.

२. कर्मचारी / अधिकारी यांवर अवलंबित असणारी औरस मुले/सावत्र मुले/कायदेशीर दत्तक घेतलेली मुले.

(तथापि, विमा कंपनीच्या नियमानुसार अवलंबित मुलांच्या बाबतीत खालील अटी लागू राहतील.)

- १८ वर्षापेक्षा जास्त वय असलेला मुलगा / मुलगी नोकरी करत असल्यास अथवा मुलगी विवाहीत असल्यास त्यांना अवलंबित समजण्यात येणार नाही.
- तथापि, २६ वर्षापर्यंत वय असलेल्या मुलाचे शिक्षण सुरु असेल व तो कर्मचाऱ्यावर पूर्णपणे अवलंबित असेल तर अशा मुलाला अवलंबित समजण्यात येईल.
- मुलगी अविवाहीत असल्यास तिचा विवाह होईपर्यंत ती कर्मचाऱ्यांवर पूर्णपणे अवलंबित आहे असे समजण्यात येईल.)
- कर्मचाऱ्यावर संपूर्णपणे अवलंबून असलेली मतीमंद अथवा अपंग मुले.

३. कर्मचारी /अधिकारी यांवर पूर्णपणे अवलंबून असलेले कर्मचारी / अधिकारी यांचे आई-वडील, महिला कर्मचाऱ्यांच्या बाबतीत तिच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या आणि तिच्याबरोबर राहत असलेले तिचे आई-वडीलांची किंवा सासु - सासऱ्यांपैकी एकाची निवड करता येईल.

४. कर्मचारी /अधिकारी यांवर पूर्णपणे अवलंबून असलेल्या १८ वर्ष वयाखालील अविवाहीत भाऊ.

५. कर्मचारी / अधिकारी यांवर पूर्णपणे अवलंबून असलेल्या अविवाहीत बहिणी व घटस्फोटीत अथवा विधवा बहिणी, यांच्याबाबत त्यांचे वय लक्षात घेऊ नये.

६. या नियमाखालील प्रतिपूर्ती करण्यासाठी, कर्मचारी /अधिकारी यांची अंशकालीन नोकरी व्यतिरिक्त अन्य नोकरीस असलेली मुले आणि अविवाहीत मुली लाभदायक नोकरीत असल्याचे समजण्यात येईल आणि ती त्यांच्यावर अवलंबून असल्याचे मानण्यात येणार नाही. कर्मचारी / अधिकारी यांच्यावर अवलंबून असलेल्या आई वडीलांचे दरमहा किमान उत्पन्न अथवा मुळ निवृत्ती वेतन रु. ५०००/- पर्यंत आहे असे आईवडील तसेच घटस्फोटील / विधवा बहीण हे कर्मचाऱ्यांवर अवलंबून आहेत असे समजण्यात येईल.

**ब)** म.रा.वि.मं.कर्मचारी कल्याण निधी समितीची बैठक यापुढे दर चार महिन्याने म्हणजेच वर्षातून तीनदा घेण्यात येईल.

सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या RAPDRP-Infoportal-(Circular-I.R. Dept.) येथे उपलब्ध असून त्याची मुद्रांकित प्रत प्रसारित करण्यात येणार नाही.

(संजय ढोके)
**मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी (प्रभारी)**

**प्रत सविनय सादर :**

१. संचालक (वित्त), म.रा.वि.मं. सुत्रधारी कं. मर्या., हॉंगकॉंग बँक इमारत, फोर्ट, मुंबई.
२. कार्यकारी संचालक (मासं), महावितरण/ महानिर्मिती / महापारेषण, मुंबई.

**प्रत सस्नेह सादर :**
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महानिर्मिती / महापारेषण, मुंबई.